दै० पुण्य नगरी दि० १७।१।१२

# आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई - जिल्हाधिकारी

सांगली/ प्रतिनिधी

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधिताविरूद्ध कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी श्याम वर्धने यांनी दिली.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी वर्धने म्हणाले, ३ जानेवारीपासून निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. जिल्हा परिषदेच्या ६२ गट व १२४ गणासाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. प्रभाग रचनेची माहिती वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी १० उपजिल्हाधिकारी दर्जाचे निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत, तर सहाय्यक म्हणून दहा तहसिलदारांची नियुक्ती केली आहे. जिल्ह्यात एकुण १५ लाख ७५ हजार ८७ मतदार संख्या आहे. यापैकी पुरूष मतदार ५ लाख १४ हजार ३२९ इतके असून स्त्री मतदार ७ लाख ६० हजार ७५८ इतके आहेत. निवडणुकीसाठी २१८६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. तर १४ हजार ५२० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान जागृती अभियानांतर्गत ग्रामीण भागात आठवडा बाजारात मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक दाखवण्यात येणार आहे. निवडणूक आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणे, कायदा व सुव्यवस्था राखणे, पारदर्शकपणे निवडणूक प्रक्रिया पार पाडणे आदी सूचना संबंधित यंत्रणेस दिल्या आहेत. आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास संबंधितावर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर रॅम्पची सोय, पाण्याची सोय करण्यात आली आहे. जिल्हा परिषद उमेदवारासाठी खर्चाची मर्यादा ३ लाख तर पंचायत समितीसाठी २ लाख रूपये करण्यात आली आहे, असेही जिल्हाधिकारी श्याम वर्धने म्हणाले.



जिल्हा परिषद निवडणूक पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी श्याम वर्धने. (छाया: धामणीकर)

## निवडणुकीसाठी चोख बंदोबस्त - डॉ. शिसवे

पत्रकार परिषदेत पोलीस अधीक्षक डॉ. रवींद्र शिसवे म्हणाले, निवडणुकीसाठी चुरस लक्षात घेऊन संवेदनशील व त्रासदायक गावे निश्चित करण्यात आली आहेत. तांत्रिकदृष्ट्या यापूर्वी ज्या मतदान केंद्रावर एकाच पक्षाला ७५ टक्के मतदान झाले आहे, अशी ७५४ गावे संवेदनशील म्हणून तर १४१ गावे त्रासदायक म्हणून निश्चित करण्यात आली आहेत. निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. एक पोलीस अधीक्षक, एक अप्पर अधीक्षक, १० पोलीस उपअधीक्षक, १५ पोलीस निरीक्षक, १७ सहाय्यक निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, २५०० कर्मचारी, ८०० होमगार्डस् तसेच माजी सैनिक व नागरिकांतून १ हजार विशेष पोलीस अधिकारी नियुक्त केले जाणार आहेत. दोन राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या, ४ पोलीस उपअधीक्षक, ४५ सहाय्यक निरीक्षक, ९०० कर्मचारी बाहेरून मागवले जाणार आहेत. निवडणूक काळात शस्त्रे जमा करण्याविषयी लवकरच निर्णय घेतला जाणार आहे. तर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे. आचारसंहितेचा भंग होणार नाही तसेच वाहनातून मतदारांची ने-आण होणार याची दक्षता घेतली जाईल. मतदारांची वाहतूक केल्यास वाहनावर गुन्हा दाखल करून त्याचा खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात दाखवला जाईल, असेही डॉ. शिसवे म्हणाले.

## 'एसएमएस' वर लक्ष

निवडणूक काळात रेडिओवरील जाहीराती तसेच चॅनेलवरील जाहिरातीच्या पट्टी यावर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. तसेच मोबाईलवर एसएमएस द्वारा आक्षेपार्ह मजकूर पाठवला जाणार नाही यावर लक्ष केंद्रीत केले जाईल. एसएमएस बाबत तक्रार आल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करून हा खर्च निवडणूक खर्चात दाखवला जाईल, असे जिल्हाधिकारी वर्धने व पोलीस अधीक्षक डॉ. शिसवे यांनी सांगितले.

दै. लोकमत दि. १७/१/२०१२

# निवडणुकीसाठी दहा अधिकारी

सांगली | दि. १६ (प्रतिनिधी)

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून दहा उपजिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, दहा तहसीलदार सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी असणार आहेत. दरम्यान, जिल्हा परिषदेसाठी १४१ गावे संवेदनशील असल्यामुळे याठिकाणी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी श्याम वर्धने व जिल्हा पोलीसप्रमुख डॉ. रवींद्र शिसवे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हा परिषदेसाठी ७ फेब्रुवारीरोजी मतदान होत असून, या निवडणुका सुरळीत निःपक्षपातीपणे घेण्यासाठी आज वरिष्ठ पोलीस अधिकारी व प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.

### तयारी निवडणुकीची

- एकूण २१८६ मतदान केंद्रे
- १४,५२० कर्मचारी नियुक्त
- एकूण मतदार १५ लाख ७५ हजार ८७
- ७५४ मतदान केंद्रे संवेदनशील
- १४१ गावांत विशेष पोलीस बंदोबस्त ठेवणार
- मतदार जनजागृती मोहीम राबविणार
- आठवडा बाजार ठिकाणी मतदानाची प्रत्यक्षिके घेणार

प्रत्येक तालुक्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आला असून, तहसीलदार हे त्यांचे सहाय्यक असणार आहेत. जिल्हा परिषदेसाठी १५ लाख ७५ हजार ८७ मतदार असून, यामध्ये महिला मतदारांची संख्या ७ लाख ६० हजार ६५८ इतकी आहे. यामध्ये आणखी पुरवणी मतदारांची भर पडणार आहे. एकूण २१८६ मतदान केंद्रे तयार करण्यात आली असून, यावर १४ हजार ५२० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

मतदान वाढावे यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येईल. आठवड्याच्या बाजार ठिकाणी मतदान यंत्रे ठेवून प्रत्यक्षिके दाखवण्यात येतील. आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी जागरुक राहण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.

ज्या मतदान केंद्रात यापूर्वी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले आहे किंवा एकाच उमेदवाराला ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले आहे अशी मतदान केंद्रे संवेदनशील गृहित धरून याठिकाणी बंदोबस्त वाढवण्यात येणार आहे.

यापूर्वी झालेल्या निवडणुकीवरून १४१ गावे संवेदनशील गृहित धरून याठिकाणी योग्य पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी बाहेरूनही पोलीस बंदोबस्त मागवण्यात येणार आहे.

### खर्च मर्यादा तीन लाख

जिल्हा परिषदेसाठी उमेदवारांना तीन लाखांची खर्च मर्यादा असून, पंचायत समितीसाठी प्रत्येक दोन लाखांची खर्च मर्यादा आहे. यामध्ये मोबाईलद्वारे प्रचार झालेला खर्चही धरण्यात येणार आहे. प्रचारासाठी ५ फेब्रुवारी रात्री १२ वाजेपर्यंत मुदत असून, रात्री दहानंतर स्पिकरवरुन प्रचार करता येणार नाही.

दै. जनप्रवास दि. १५/१/२०१२



जिल्ह्यातील आचारसंहिता परिस्थितीचा आढावा घेताना जिल्हाधिकारी श्याम वर्धने, जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ.रविंद्र शिसवे, संदिप निचीत, उपअधिक्षक बाळसिंग रजपूत आदि. (धामणीकर फोटो)

# आचारसंहिता भंग केल्यास कठोर कारवाई : वर्धने

■ सांगली :

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी पुर्णत्वाकडे आली आहे. जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असून आचारसंहिता भंग केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी श्याम वर्धने यांनी पत्रकार परिषदेत दिला. यावेळी पोलीस अधीक्षक डॉ.रविंद्र शिसवे, संदीप निचीत उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्याचे वर्धने यांनी सांगितले.

निवडणुकीसाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचे १० निवडणूक अधिकारी आणि तहसिलदारांची सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यात १५ लाख ७५ हजार ८७ मतदार असून त्यापैकी ८ लाख १४ हजार ३२९ पुरुष (पान ५ वर..)

## आचारसंहिता भंग केल्यास कठोर कारवाई..

तर ७ लाख ६० हजार ७५८ स्त्री मतदार आहेत. जिल्ह्यात २१८६ मतदान केंद्र असून १४ हजार ५२० कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत. जिल्ह्यात ७५४ संवेदनशील मतदान केंद्र असून १४१ गावे त्रासदायक आहेत.

यावेळी पोलीस अधीक्षक डॉ.रविंद्र शिसवे म्हणाले की, निवडणुकीसाठी जिल्ह्यात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. एक पोलीस अधीक्षक, १ अतिरिक्त पोलीस अधीक्षक, १५ पोलीस निरीक्षक, २५०० पोलीस कर्मचारी, ९७ पोलीस फौजदार, उपनिरीक्षक, ८०० गृहरक्षक दलाचे जवान आणि निवृत्त पोलीस माजी सैनिक , माजी सैनिक व निवृत्त अधिकारी असे १००० पोलीस विशेष पोलीस आणि दोन एस.आर.पी.च्या तुकड्या, चार पोलीस उपअधीक्षक, ४५ सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि ९०० पोलीस कर्मचारी बाहेरून मागवण्यात येणार आहेत. मतदारांची ने-आण करताना वाहन सापडल्यास थेट गुन्हे दाखल करण्यात येतील, असे डॉ. शिसवे यांनी सांगितले.

दै. तरुण भारत दि. १०/१/२०१२

# खासगी कामगारांना मतदानासाठी तीन तास सुट्टी

▶सांगली / प्रतिनिधी

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांना मतदान करण्यासाठी शासकीय सुट्टी असणार आहे. मात्र शासकीय आणि निमशासकीय कार्यालये वगळून खासगी कार्यालये, कारखाने व अन्य ठिकाणच्या मतदारांना मतदान करता यावे म्हणून तीन तास सक्तीची सुट्टी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. जे कामगारांना तीन तासाची सुट्टी देणार नाहीत. त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा निवडणूक आयोगाने दिला आहे.

मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून आयेगाने ही सक्ती केली आहे. अलिकडच्या काळात मतदानाची टक्केवारी घटत आहे. त्यामुळेच सर्वांनाच मतदान करता यावे म्हणून निवडणूक आयोगाने हे पाऊल उचलले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी सात फेब्रुवारी रोजी मतदान होत आहे. त्या दिवशी शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांना सुट्टी आहे. मात्र खासगी कर्मचाऱ्यांनाही मतदान करता यावे यासाठी त्यांना तीन तास सक्तीची सुट्टी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र शासकीय सुटटी घेवून सहलीसाठीही जाणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे सक्तीचे मतदान करण्याचीही अट आयोगाने घालावी अशीही मागणी होत आहे.

दै तरुण भारत दि १५।१।२०१२

# निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज : चोख बंदोबस्त

## आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर कडक कारवाई

▶सांगली / प्रतिनिधी

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे, निवडणूक काळात कायदा आणि सुव्यवस्था चोख ठेवण्यात येणार आहे. मतदान केंद्रे आणि कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी श्याम वर्धने आणि पोलीस अधीक्षक रवींद्र शिसवे यांनी बैठकीत दिली.

त्यांनी सांगितले, १७ जानेवारीला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. १८ ते २३ जानेवारी या काळात अर्ज भरण्याची प्रक्रिया आहे. ३० जानेवारी ही अर्ज घेण्याची अंतिम मुदत आहे. पाच फेब्रुवारीला रात्री १२ वाजता प्रचाराची सांगता होईल. सात फेब्रवारीला मतदान तर आठला मतमोजणी होणार आहे.

६२ जिल्हा परिषद तर १२४ पंचायत समिती मतदार संघ आहेत. त्यासाठी १५ लाख ७५ हजार मतदार मतदान करणार आहेत. २१८६ मतदार केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. त्यासाठी १४ हजार ५०० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. दहा तालुक्यासाठी दहा निवडणूक अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी नियुक्त केले आहेत.

तर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहेत. १४१ संवेदनशील गावे आहेत, त्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. त्याठिकाणी विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. एसआरपी, होमगार्ड, निवृत्त लष्करी जवान आदीसह जिल्ह्यातील २५०० पोलीस बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणार आहेत.

खासगी शस्त्रधारकांच्याकडील शस्त्र तात्पुरत्या काळासाठी जप्त करण्यात येणार आहेत. या शिवाय मतदारांच्या जागृती करण्यासाठी आठवडी बाजारांमध्ये डेमो मशिन फिरवण्यात येणार आहेत.

मतदानादिवशी खासगी वाहने मतदानासाठी ने आण करत असतील तर त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार आहे. प्रचारासाठी लागणारा कोणताही मजकूर प्रथम तपासूनच प्रसिद्धीसाठी द्यावा, एसएमएसचा गैरवापर करणाऱ्यांवरही कडक कारवाई करण्यात येणार आहे.

> जिल्हा परिषद ६२ मतदार संघ, पंचायत समिती १२४ मतदार संघ, मतदार संख्या १५ लाख ७५ हजार, कर्मचारी नियुक्त १४ हजार ५००, पोलीस बंदोबस्त २५०० याशिवाय होमगार्ड, निवृत्त जवान, १४१ संवेदनशील गावे, मतदार ने-आण करणाऱ्या खासगी वाहनांवर कारवाई, प्रसिद्धी मजकूर तपासला जाणार आहे.

दै सकाळ दि १५/१/२०१२

# पिण्याचे पाणी द्या, अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार

## संतप्त नांद्रेवासीयांचा इशारा; 'भारत निर्माण' कधी पूर्ण होणार?

कर्नाळ, ता. १६ : नांद्रेची प्रादेशिक नळ-पाणीपुरवठा योजना जुनी असून तिला घरघर लागली आहे. या योजनेत इतर १० ते १२ गावे आहेत. वीज भारनियमन व दुरुस्तीमुळे तर कधी लहरी नियोजनामुळे पाणीपुरवठ्यावर विपरित परिणाम होतो. परिणामी जनतेला पाण्यासाठी भटकंती करावी लागते. २६ जानेवारी २०१२ प्रजासत्ताकदिनापर्यंत पाणी मिळाले नाही तर महिलांसह फेब्रुवारी महिन्यांमध्ये आंदोलन करावे लागेल. तसेच आगामी निवडणुकीवर बहिष्काराची टाकावा लागेल, असा इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे.

गावामध्ये सार्वजनिक कूपनलिका आहेत. परंतु त्यापैकी काहींचे पाणी पिण्यास योग्य नाही. तर काही पाण्याविना बंद तर काही नादुरुस्त आहेत. वर्षाची पाणीपट्टी भरूनही ७० ते ८० दिवस नळाला पाणीच येत नाही. आले तरी कमी दाबाने एक तासाहून कमी येते. या पार्श्वभूमीवर भारत निर्माण योजनेतून दि. १४ डिसेंबर २००७ ला नवीन नळ योजनेला मंजुरी मिळाली. त्यासाठी दोन कोटी चौदा लाख एकोणीस हजार चारशे चाळीस रुपये मंजूर झाले आहेत. परंतु प्रत्यक्ष काम ९जानेवारी २००९ ला चालू झाले. काम पूर्ण करण्याची १२ महिन्यांची अट असताना २०१२ साल उजाडले तरी भारत निर्माण योजनेतून नांद्रेमध्ये नळांना पाणी आले नाही व कधी येईल याची खात्री नाही. यामध्ये काही काळेबेरे असावे, अशी जनतेमधून चर्चा आहे.

### महिलांनाच अधिक त्रास

गावचा मुख्य व्यवसाय शेती असल्याने शेतकरी, शेतमजुरांची संख्या मोठी आहे. त्यांच्याकडे दुभती व व शेतीसाठी जनावरे आहेत. गावात ऐंशी टक्क्यांहून अधिक घरात शौचालये आहेत. तसेच गावचा विस्तारही वाढलेला असल्याने पाण्याची मागणी वाढली आहे. वेळी अवेळी पाणी सुटत असल्याने पाण्यासाठी घरी बसावे तर रोजंदारी बुडून संध्याकाळी चूल पेटत नाही. प्रामुख्याने महिलांना याचा अधिक त्रास होत आहे.

दै. पुढारी दि. १०/१/२०१२

# निवडणुकीत १४१ गावे, ७१४ केंद्रांवर विशेष लक्ष

## जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिसप्रमुखांची माहिती

**सांगली : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी ७१४ मतदान केंद्रे आणि १४१ गावांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. ही माहिती आज जिल्हाधिकारी श्याम वर्धने आणि जिल्हा पोलिस प्रमुख डॉ. रवींद्र शिसवे यांनी पत्रकार बैठकीत दिली. वर्धने यांनी सांगितले की, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचे घुमशान उमेदवारांची नावे जाहीर झाल्यानंतरच सुरू होणार असले तरी निवडणुकीत वापरण्यात येणाऱ्या साऱ्या मार्गांवर व खर्चांवर निवडणूक यंत्रणा नजर ठेवून आहे. ते म्हणाले, जिल्हा परिषदेसाठी प्रत्येक उमेदवाराला ५ लाख तर पंचायत समितीच्या उमेदवाराला ३ लाखांपर्यंत खर्चाची मर्यादा देण्यात आली आहे. पान २ वर ▶

पान १ वरून



सांगली: जिल्हाधिकारी श्याम वर्धने यांनी आज निवडणुकीसंदर्भात अधिकाऱ्यांची व्यापक बैठक घेऊन सूचना दिल्या. (छाया : मिलिंद)

निवडणुकीत १४१ गावे, ७१४ केंद्रांवर विशेष लक्ष

अर्ज भरल्याच्या दिवसापासून त्यांनी खर्चाचा हिशोब निवडणूक यंत्रणेकडे सादर करायचे आहेत. १८ ते २३ जानेवारीपर्यंत अर्ज स्विकृतीची मुदत आहे. २४ रोजी अर्जांची छाननी होईल. याच दिवशी वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल. जर कोणाला हरकत असेल तर २७ जानेवारीपर्यंत त्याबाबत निकाल दिले जातील. ३० जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. २१८६ मतदान केंद्रांची यादी १ फेब्रुवारी रोजी प्रसिध्द केली जाईल. ७ फेब्रुवारी रोजी मतदान होईल आणि ८ रोजी निकाल जाहिर करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली. जिल्हाधिकारी वर्धने यांनी आज संबंधीत सर्व अधिकारी, सहाय्यक अधिकारी, उपविभागीय अधिकारी, पोलिस अधिकारी यांची व्यापक बैठक घेऊन आचारसंहिता, मतदान केंद्रांवरील व्यवस्था, वाहतूक, मतदान यंत्रे, कायदा व सुव्यवस्थेबाबत सक्त सुचना दिल्या.

**७१४ केंद्रे, १४१ गावांवर नजर:** निवडणुकीत अख्खा बुथच कॅप्चर करण्याचे प्रकार सांगली जिल्ह्यात आजपर्यंत घडले नाहीत, पण ७१४ मतदान केंद्रे आणि १४१ गावे मात्र त्रासदायक ठरणार असल्याचा अंदाज जिल्हा पोलिस प्रमुख डॉ.शिसवे यांनी व्यक्त केला. त्या ठिकाणी विशेष लक्ष ठेवण्यात येईल.

केसरी

केसरी दि. १५/१/२०१२

(पान १ वरून)

## उमेदवारीत ३० टक्के युवकांना स्थान : विश्वजित कदम

असून राज्यात चार नवीन राज्य सचिवांची नियुक्ती केली आहे. या नियुक्त्या कोणाच्या आदेशाने नाही, तर निवडणुकीतूनच झालेल्या आहेत. त्यामध्ये सांगली जिल्ह्यातील वैभव गायकवाड, सिध्दार्थ हत्तींबरे (परभणी), डॉ. जितेंद्र देहाडे (औरंगाबाद ), लिना लेमिन्नवर (हिंगोली) आदींचा समावेश आहे. राज्यात सुमारे ५८ हजार युवा कार्यकर्त्यांना ओळखपत्र देण्यात येणार आहे. भ्रष्टाचाराच्या नावाने गळा काढणारा भाजपच भ्रष्टाचारात बुडाल्याचे निदर्शनास आणण्यासाठी नागपुरात युवक कॉंग्रेसने मोठा मोर्चा काढून जनतेचे लक्ष वेधले होते, असे सांगून डॉ. कदम म्हणाले की, या निवडणुकीत राज्यात सर्वत्रच युवक कॉंग्रेस सक्रिय राहणार असून, खासदार राहुल गांधी, केंद्रीय मंत्री जोतिरादित्य शिंदे, सचिन पायलट यांच्यासारख्या युवा नेत्यांच्या सभा राज्यात काही ठिकाणी घेण्यात येणार आहेत. कॉंग्रेसच्या पाठीशी जनतेचे भक्कम पाठबळ असल्याने सक्रिय युवक कॉंग्रेसच्या प्रयत्नांना यश येणार हे निश्चित आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेवर कॉंग्रेसचाच झेंडा फडकणार, अशी ग्वाहीही त्यांनी या वेळी दिली.

## जिल्ह्यातील ३०० पोलिसांना 'कारणे दाखवा' नोटीसा

ग्रामीण पोलीस ठाण्याकडील हवालदार नन्हुखान शेख याने नोकरीच्या आमिषाने फसवणूक केल्याबाबत त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला. हे होऊन दोन-तीन दिवस होतायत न होतायत एवढ्यांच एक पोलीस निरीक्षक श्री. कुशे आणि आटपाडीचे हवालदार श्री. शिंदे हे गजाआड झाले. एकापाठोपाठ एक घडलेल्या या गंभीर घटनांनी जिल्हा पोलीस दल हादरुन गेले. त्यानंतर डॉ. शिसवे यांनी कडक पावले उचलत कर्तव्यात कसूर करणाऱ्या ३०० जणांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावली. याचबरोबर सांगली ग्रामीणचे पोलीस निरीक्षक एस.एस. बेळ्ळम आणि आटपाडीचे पोलीस निरीक्षक संजय पवार यांच्या खातेनिहाय चौकशीचेही आदेश दिले आहेत.

सांगली शहर आणि विश्रामबाग पोलीस ठाण्याकडील स्थानिक गुन्हे प्रकटीकरण शाखांची अचानक तपासणी करुन तेथे अतिरिक्त असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर इतर जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत, तर मुख्यालयातही अतिरिक्त असलेल्या कर्मचाऱ्यांना कर्तव्याच्या ठिकाणी पाठविण्याची कारवाईही डॉ. शिसवे यांनी केली आहे.

## जिल्ह्यातील ७५४ मतदार केंद्रे संवेदनशील

बंदोबस्त ठेवण्यात येणार आहेत. यापूर्वी ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत. त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई होणार आहे.

ज्यांच्याकडे परवानाधारक हत्यारे आहेत, अशी हत्यारे निवडणुकीपूर्वी ताब्यात घेणार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश येताच येत्या सात दिवसात ही कार्यवाही पूर्ण होईल. पेट्रोलिंग, स्ट्रायकींग फोर्स आदी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

यापूर्वी ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत त्यांची यादी करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून पोलीस उपअधीक्षक संबंधितांवर कारवाई करण्याच्या सूचना देतील, असे स्पष्ट केले आहे.

# जिल्ह्यातील ७५४ मतदार केंद्रे संवेदनशील

*सांगली : जिल्ह्यात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील ७५४ मतदार केंद्रे तांत्रिकदृष्ट्या संवेदनशील, तर १४१ गावे त्रासदायक जाहीर केली आहेत. या निवडणुका शांत व निर्भीड वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा पोलीस दल सक्रिय झाले असून, सुमारे*

### निवडणुकीसाठी पोलीस बंदोबस्त

* १ पोलीस अधीक्षक व १ अपर पोलीस अधीक्षक
* १० पोलीस उपअधीक्षक
* १५ पोलीस निरीक्षक

*टक्केपेक्षा जास्त मतदान झाले आहे अशी मतदान केंद्रे ही त्रासदायक म्हणून जाहीर केली आहेत. अशा ठिकाणी आवश्यक तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येत आहे. ज्या गावात वारंवार वाद होतात किंवा यापूर्वी निवडणुकीवेळी वाद झाले आहेत अशी १४१ गावे त्रासदायक म्हणून जाहीर केली आहेत.*